## दिन विशेष...

१८७९ : अल्बर्ट आईन्स्टाईन यांचा जन्मदिन.
१८८३ : कार्ल मार्क्स यांचे निधन.
१९३१ : चित्रपट बोलू लागला.
१९३१ : पहिला भारतीय बोलपट आलम आरा नॉव्हेल्टी या सिनेमागृहात दाखवला गेला.
१९८८ : जपानमध्ये समुद्रांतर्गत रेल्वे वाहतुकीस प्रारंभ.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७४,५६३.९२ -१,४७०.५० (१.९३%)
डॉलर ₹ ९२.३६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २० |
| दिल्ली | ३२ | १९ |
| मुंबई | ३६ | २४ |
| नागपूर | ३८ | २१ |
| पुणे | ३८ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार , दि. १४ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२२ किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

प्रत्येक निराशामागे एक आशेचा किरण लपलेला असतो. त्याला शोधून काढण्याची क्षमता आपल्यात आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३७ संध्या-६:३७

**सोने - चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६२,८६५/- २,७९,९००/-

# होर्मुझच्या सामुद्रधुनीत २७ तेलवाहू जहाज अडकले

**सर्व जहाजांवर ७०० हून अधिक भारतीय खलाशी; ३ खलाशांचा मृत्यू**




**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

अमेरिका, इस्त्राईल-इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या दरम्यान, भारतीय ध्वज असलेले एक तेलवाहू जहाज (ऑइल टँकर) 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'तून सुखरूप बाहेर पडले आहे, तर इतर २७ जहाजे अजूनही युद्धग्रस्त भागातच अडकलेली आहेत, अशी अधिकृत माहिती सरकारने शुक्रवारी दिली. सरकारने पुढे असेही सांगितले की, हे युद्ध सुरू असताना तीन भारतीय खलाशांना आपला जीव गमवावा लागला आहे आणि एक खलाशी अजूनही बेपत्ता आहे. या सर्व जहाजांवर मिळून ७०० हून अधिक खलाशी तैनात आहेत.

अमेरिका आणि इस्रायलने इराणविरोधात पुकारलेल्या युद्धामुळे इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर कब्जा मिळवला आहे. त्यामुळे येथील जहाज वाहतूक पूर्णतः थांबली आहे. पर्शियन खाडीला जागतिक बाजारपेठेशी जोडणारा अरुंद मार्ग असलेल्या हॉर्मुझच्या सामुद्रधुनीफ्तील वाढत्या तणावामुळे, विविध देशांची सरकारे आणि जहाजांच्या कंपन्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नौकानयन मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश के. सिन्हा यांनी सांगितले की, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये आणि आसपास कार्यरत असलेल्या भारतीय जहाजांवर सरकार सतत लक्ष ठेवून आहे. भारतीय ध्वज असलेले एक जहाज आज हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून बाहेर पडले आहे.

या जहाजाबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, हे जहाज सामुद्रधुनीच्या पूर्व दिशेला होते आणि त्याला हा मार्ग (पान २ वर)

**प्रतिकिलो ३० रुपयांपर्यंत दरवाढ**

# खाद्यतेलाला महागाईचा तडका!

**वृत्तसंस्था । नाशिक**



**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धाचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठेवर होत असून, नाशिकमध्ये खाद्यतेल आणि सुकामेव्याच्या दरात पुन्हा वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांत खाद्यतेलांच्या दरात प्रतिकिलो १५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरातील बजेट कोलमडले असून, सुकामेव्याचे दरही आवाक्याबाहेर गेले आहेत.**

खाद्यतेलांचे दर

| तेल | जुने दर | नवे दर |
|---|---|---|
| सूर्यफूल | २,३७५ | २,५३५ (१३ किलो) |
| सोयाबीन | २,२७० | २,४३० (१५ किलो) |
| शेंगदाणा | २,७०० | ३,०३० (१५ किलो) |

रशिया आणि युक्रेन या देशांतून स्थानिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात सूर्यफूल तेलाची आयात होते.

इस्रायल, अमेरिका- इराण युद्धामुळे इतर देशांतील पुरवठा साखळीवरही ताण निर्माण झाल्याचे व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे.

परिणामी सोयाबीन, सूर्यफूल आणि शेंगदाणा तेलांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. आठवडाभरात खाद्यतेलाच्या प्रतिकिलो दरामध्ये साधारण १५ ते ३० रुपयांची वाढ झाली आहे. याशिवाय सूर्यफूल तेलाचा १३ किलोचा आणि सोयाबीन तेलाचा १५ किलोचा डबा तब्बल दीडशे रुपयांनी, तर शेंगदाणा तेलाचा १५ किलोचा डबा ३५० रुपयांनी महागला आहे.

### शेंगदाणा आवाक्याबाहेर

**घाऊक बाजारात शेंगदाणा प्रतिकिलो १७५ ते १८० रुपयांनी विक्री होत आहे. कच्च्या मालाच्या दरवाढीचा परिणाम शेंगदाणा तेलावरही झाला असून, शेंगदाणा तेलाचा १५ किलोचा डबा साडेतीनशे रुपयांनी महागला आहे. राण युद्ध आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघर्षामुळे खाद्यतेल, सुकामेव्याची आयात विस्कळीत झाली आहे. त्यामुळे आठवडाभरात दरांतही तेजी आली आहे.**

## थोडक्यात




### शेअर बाजारात 'ब्लॅक फ्रायडे'!

**मुंबई ।** पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावाचा आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा थेट फटका आज भारतीय शेअर बाजाराला बसला. सेंसेक्स १,४७०.५० अंकांनी कोसळून ७४,५६३ वर बंद झाला, तर निफ्टी-५० तब्बल ४८८ अंकांनी गडगडून २३,१५१ वर स्थिरावला. या एकाच दिवसाच्या घसरणीत गुंतवणूकदारांचे ९.४४ लाख कोटी रुपये एका झटक्यात बुडाले.

### नमाजसाठी जाणाऱ्या २१ कामगारांचा टेम्पो उलटला

**अलिबाग ।** तालुक्यात नमाज अदा करण्यासाठी जात असताना भीषण रस्ते अपघात झाला आहे. २१ जणांना घेऊन जाणारा पिकअप टेम्पो पलटी झाल्यामुळे एकाचा जागीच मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने मदतकार्य सुरू केले.जखमींना उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काही जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.



### माजी मंत्र्याच्या २८ शाळांवर प्रशासकाची नियुक्ती

**नाशिक ।** जिल्ह्यातील नामवंत शिक्षण संस्था असलेल्या महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेला राज्य सरकारने मोठा धक्का दिला आहे. संस्थेच्या तब्बल २८ माध्यमिक शाळांवर अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराचा ठपका ठेवत शिक्षण संचालकांनी प्रशासक नियुक्तीचे आदेश जारी केले आहेत. माजी मंत्री प्रशांत हिरे यांच्या कुटुंबियांच्या अधिपत्याखालील या संस्थेवरील कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गेल्या एप्रिल महिन्यात नाशिक जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने या शाळांची धडक चौकशी केली होती. या चौकशी अहवालात अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या होत्या.

# ई-रिक्षा, ई-बाईकसाठी आता परवाना बंधनकारक

**● परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मोठी घोषणा**

**वृत्तसंस्था । मुंबई**



**राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. तथापि, प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई-बाईकसाठी यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करून परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.**

आतापर्यंत इलेक्ट्रिक रिक्षांना (ई-रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परवाना घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करता केंद्र शासनाच्या नियमानुसार प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाईक साठीही परवाना प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यानिर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहतील. तसेच प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळणे हा यामागील उद्देश असल्याचे मंत्री सरनाईक म्हणाले. परवाना प्रक्रियेत (पान २ वर)

## इराणच्या ड्रोन हल्ल्यात इराकमध्ये मुंबईच्या इंजिनिअरचा मृत्यू

**वृत्तसंस्था । बगदाद**



मध्य पूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इराण संघर्षाला १२ दिवस होत आहेत. या युद्धात आता मुंबईच्या एका मरिन इंजिनिअरचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. मुळचे बिहारचे असलेले देवानंद प्रसाद सिंह (वय ५०) हे २०१९ साली मुंबईला येऊन स्थायिक झाले. मरिन इंजिनिअर असलेले सिंह कार्गो शिपवर काम करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. देवानंद सिंह सध्या इराकमधील सेफसी विष्णू तेलाच्या जहाजावर अतिरिक्त मुख्य अभियंता (अधीक्षक) म्हणून काम करत होते. इराकच्या बसरा येथे असलेल्या खोर अल झुबैर बंदरावर उभ्या असलेल्या सेफसी विष्णू जहाजावर हल्ला झाला. या हल्ल्यात त्यांचे निधन झाले. दोन दिवसांपूर्वी इराण-इस्रायल युद्धामुळे त्यांच्या जहाजावर हल्ला झाला. या हल्ल्यात देवानंद सिंह यांना दुखापत झाली, (पान २ वर)

# मराठी भाषा न शिकवणाऱ्या शाळा, संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल

**● शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली घोषणा**

**वृत्तसंस्था । मुंबई**

**राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य असताना काही ठिकाणी मराठी शिकवली जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्याने राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. मराठी भाषा न शिकवणाऱ्या शाळा आणि संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली आहे.**

मुंबई येथील काही इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी शिकवली जात नसल्याचा मुद्दा शिवसेना युबीटीचे आमदार हारूण खान यांनी विधानसभेत उपस्थित केला होता. त्यावर झालेल्या चर्चेदरम्यान शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असून याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**● विधानसभेत यासंदर्भात माहिती देताना दादा भुसे म्हणाले की, ज्या माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही अशा तक्रारी प्राप्त झाल्यास तात्काळ चौकशी केली जाईल. चौकशीत संबंधित शाळेत मराठी शिकवली जात नसल्याचे आढळल्यास प्रथम त्या शाळेला सूचना दिल्या जातील. मात्र त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळा आणि संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल.**



# एक कोटीहून अधिक लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या का?

**तरतुदीत ९५०० कोटींची घट होण्याचे कारण काय? : रोहिणी खडसे यांचा सरकारवर घणाघात**

**वृत्तसंस्था । मुंबई**

**महाराष्ट्र सरकारचा अर्थसंकल्प नुकताच मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारने २०२६-२७ या वर्षासाठी २६५०० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. मागील वर्ष २०२५-२६ च्या तुलनेत या तरतुदीत ९५०० कोटींची म्हणजेच २६ टक्क्यांची घट झाली आहे.**

लाडक्या बहीणींना दरमहा मिळणारे १५०० रूपये २१०० रूपयांपर्यंत वाढवण्याचे आश्वासन विधानसभा निवडणुकांपूर्वी महायुती सरकारने दिले होते. त्यासाठी लाडक्या बहीणींना अजून प्रतिक्षा करावी लागणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या तरतुदीत घट झाल्याने रोहिणी खडसे यांनी महायुती सरकारवर घणाघात केला आहे.

### रोहिणी खडसे यांचे आरोप



**राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी लाडक्या बहिणींना अपात्र ठरवले जात असल्याचा आरोप महायुती सरकारवर केला आहे. रोहिणी खडसे म्हणाल्या, आता क्षणाला मी ही पोस्ट करत असताना विधिमंडळात महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या विषयावर चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, संत्री, तज्ज्ञ मंडळी यावर भाषणं ठोकतील आणि दुसरीकडे सरकारने आतापर्यंत तब्बल १.०५ कोटी लाडक्या बहीणींना अपात्र ठरवले आहे. सरकारचा हा किती दुटप्पीपणा आहे ? २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा ही योजना सुरू केली होती तेव्हा परिस्थिती काय होती ?**

सरकारने आतापर्यंत तब्बल १ कोटी पाच लाख लाडक्या बहीणींना अपात्र ठरवले आहे, शासनाची ही वागणूक म्हणजे अपना काम बनता, अभी भाड़ में जाए जनता, असा आरोप रोहिणी खडसे यांनी केला आहे.

खरंच लाडक्या बहीणींना अपात्र ठरवण्यात आले आहे का? याबाबत जाणून घेऊयात.

दरम्यान, रोहिणी खडसे यांनी आकडेवारी देत सरकारवर हल्लाबोल केला आहे. त्यापुढे म्हणाल्या, सुरुवातीचे लाभार्थी : २.५३ कोटी, सुरुवातीचे बजेट: ४५ हजार कोटी रुपये, तपासणीनंतर संभाव्य पात्र लाभार्थी: १ कोटी ४८ लाख ६० हजार २०२६-२७ बजेटमध्ये तरतूद : २६,५०० कोटी, संभाव्य अपात्र महिला सुमारे: १.०५



कोटी. म्हणजे निवडणूक होती तेव्हा शासनाने सरसकट लाडक्या बहीणींना पैसे दिले.

निवडणुका जिंकल्या तर हळूहळू लाडक्या बहीणींवरचे प्रेम कमी होऊ लागले. शासनाची ही वागणूक म्हणजे अपना काम बनता, अभी भाड़ में जाए जनता!, असा घणाघात रोहिणी खडसे यांनी महायुती सरकारवर केला आहे.

### लाडकी बहीण योजनेच्या तरतुदीत घट?

**२०२६-२७ च्या अर्थसंकल्पात लाडक्या बहीण योजनेचे लाभार्थी १.५३ कोटी असतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही अपात्र असलेल्या महिला तसेच काही पुरूषांनीदेखील लाडक्या बहीण योजनेचा लाभ घेतल्याचे राज्य सरकारला आढळून आले होते. त्यानंतर राज्य सरकारने योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला या खरोखर योजनेसाठी पात्र आहेत का? हे तपासण्यासाठी विविध स्तरांवर पडताळणी सुरू केली आहे.**

## काँग्रेसमध्ये उभी फूट? ६ आमदार नॉट रिचेबल



**वृत्तसंस्था । भुवनेश्वर**

देशातील १० राज्यांमधील ३७ राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुका होत असून १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. मात्र या निवडणुकीआधीच ओडिसामधील काँग्रेसचे सहा आमदार नॉट रिचेबल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार हे सहा आमदार गुरुवारी रात्री बेंगळुरूला पोहोचले असून त्यांना एका फार्महाऊसमध्ये ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या आमदारांमध्ये यामध्ये आमदार अशोक कुमार दास, प्रफुल्ल चंद्र प्रधान, पबित्रा सौटा, कद्रका अप्पाला स्वामी, राजेन एक्का आणि सत्यजित गोमांगो यांचा समावेश आहे.

## संपादकीय

### बळीराजाला युद्ध झळांचे चटके

अस्मानी असो वा सुलतानी, कोणत्याही संकटामध्ये अंतिमतः भरडला जातो तो अन्नदाता शेतकरीच! इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धसंघर्षाची झळ देशातील शेतीक्षेत्राला बसू लागली आहे. इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षाने आता केवळ आखाती देशांच्या सीमांपुरते मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्थेवर आपले विपरीत परिणाम उमटवण्यास सुरुवात केली आहे. भारतासाठी हा संघर्ष केवळ राजनैतिक चिंतेचा विषय नसून, देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेवर घाला घालणारा ठरत आहे. महाराष्ट्र हे देशातील कांदा आणि फलोत्पादनाचे मुख्य केंद्र आहे. मात्र, आखातातील युद्धाने या क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. जवाहरलाल नेहरू बंदर अर्थात जेएनपीटी येथे नाशिक आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून आलेले सुमारे १५० कंटेनर्स सध्या अडकून पडले आहेत. या कंटेनर्समध्ये जवळपास ४,५०० टन कांदा असून, त्याचे गंतव्य स्थान दुबई आणि इतर आखाती शहरे होते. दुबई हे भारतीय कांद्यासाठी एक प्रमुख व्यापारी केंद्र मानले जाते, जिथून संपूर्ण आखाती देशांमध्ये कांद्याचा पुरवठा होतो. मात्र, युद्धामुळे दुबईची बाजारपेठ ठप्प झाली असून, शिपिंग लाइन्सनी आपली वाहतूक तात्पुरती स्थगित केली आहे. सध्या रमजानचा महिना सुरू असल्याने कांद्याला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, निर्यात थांबल्याने हा सर्व माल आता स्थानिक बाजारपेठेत येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कांद्याचे दर कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत, शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान देण्याची आणि बंदराचे शुल्क माफ करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत निर्यात पूर्ववत होत नाही, तोपर्यंत सरकारने मध्यस्थी करून खरेदी योजना राबवणे आवश्यक झाले आहे. केवळ कांदाच नव्हे, तर द्राक्षे आणि आंबा यांसारख्या नाशवंत पिकांवरही या युद्धाचा मोठा परिणाम झाला आहे. सुमारे ३,९०० टन द्राक्षे असलेले ३०० कंटेनर्स जहाजांवर चढवले गेले होते, परंतु युद्धामुळे ही जहाजे पुढे जाऊ शकली नाहीत. आता हा माल परत उतरवून स्थानिक बाजारात विकावा लागणार आहे. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष मारुती चव्हाण यांच्या मते, सुमारे ६ हजार टन द्राक्ष उत्पादनावर याचा थेट परिणाम होणार आहे. निर्यातक्षम द्राक्षे जेव्हा स्थानिक बाजारात कमी दराने विकली जातात, तेव्हा शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनाही या युद्धाचा फटका बसू लागला असून सोलापूर जिल्ह्यात याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. कोट्यवधी रुपयांची केळी निर्यात ठप्प झाली असून शीतगृहांमध्ये सुमारे १२०० कंटेनर्स अडकून पडले आहेत. या संकटामुळे केळीची कापणी पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. केवळ कापणीच नव्हे, तर आधीच निर्यातीसाठी पाठवलेले कंटेनर्सही आता मोठ्या अनिश्चिततेत अडकले आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे जहाजे उपलब्ध नसल्याने शीतगृहात साठवलेला माल आता उतरवून घेण्याची वेळ उत्पादकांवर आली आहे. या सर्व भौगोलिक-राजकीय घडामोडींमुळे महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून त्यांचे अतोनात नुकसान होत आहे. भारताच्या कृषी निर्यातीत बासमती तांदळाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या एकूण बासमती निर्यातीपैकी तब्बल ७२ टक्के निर्यात केवळ आखाती देशांना केली जाते. इराण हा एकेकाळी भारतीय बासमतीचा सर्वात मोठा आयातदार होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून तिथल्या अंतर्गत घडामोडी आणि आताच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इराणची आयात घटली आहे. जागतिक बाजारपेठेत भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या या संकटातून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी ठोस धोरणाची आवश्यकता आहे.

# शिक्षणाच्या बाजारीकरणाविरोधात अभाविपचा विद्यार्थी आक्रोश मोर्चा

### उठ दोस्ता, उगार मूठ... तूच थांबव तुझ्या शिक्षणाची लूट ; जोरदार घोषणाबाजी




प्रतिनिधी । धुळे

**वाढत्या शिक्षणाच्या बाजारीकरणाविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद धुळे शाखेतर्फे दि.१२ रोजी शहरातून विद्यार्थी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी बॅनर फलक हातात घेत जोरदार घोषणाबाजी केली. उठ दोस्ता उगार मुठ... तूच थांबव तुझ्या शिक्षणाची लूट, अशा विविध घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला. शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्न, मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनास सादर केले.**

मा.ध. पालेशा महाविद्यालय विद्यार्थी आक्रोश मोर्चा प्रवेशव्दारापासून मोर्चाला सुरूवात झाली. संतोषी माता चौकमार्गे क्युमाईन क्लबनजीक मोर्चा धडकला. जिल्ह्यातील कृषी, आयटीआय, वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र तसेच इतर महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी या मोर्चात सहभागी झाले होते. या निवेदनातून स्पर्धा परीक्षांचे वाढते शुल्क कमी करावे. अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे, विद्यार्थिनींच्या मोफत शिक्षणाच्या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. प्रलंबित शिष्यवृत्ती, विद्यावेतन व निर्वाह भत्ता तात्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करावा. शासकीय वसतिगृहांचे नूतनीकरण करणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत बस पास देणे तसेच विविध विद्यापीठांतील रिक्त प्राध्यापक पदे भरणे आदी प्रमुख मागण्या करण्यात आल्या. तसेच आयटीआय इमारती व उपकरणांचे नूतनीकरण, एमएच-सीईटीसाठी सुलभ अर्ज प्रक्रिया, महाविद्यालयीन निवडणुका सुरू करणे, मराठी माध्यम शाळांची गुणवत्ता वाढवणे आणि वैद्यकीय इंटर्न्स व रेसिडेंट डॉक्टर्स यांचे स्टायपेंड वाढवणे या मागण्याही निवेदनातून जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. शासनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीयनि लक्ष देऊन तात्काळ निर्णय घ्यावेत, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या मोर्चात जिल्हा संयोजक लहानू कोळेकर, शिरपूर शहरमंत्री रुपेश कोष्टी, दोंडाईचा शहरमंत्री हिमांशू चित्ते, मोर्चा प्रमुख मनिष कुलकर्णी, शहर कार्यालय मंत्री हेमंत महाले आदींसह अभाविपचे पदाधिकारी आणि जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नंदुरबारात संताजी महाराजांचे स्मारक उभारावे



प्रतिनिधी । नंदुरबार

### • नगरसेवक गौरव चौधरी यांची नगराध्यक्षांकडे मागणी

**नंदुरबार शहरात श्री संत जगनाडे महाराज (संताजी) यांचा पूर्णकृती पुतळा, स्मारक बनविण्यात यावा, अशी मागणी येथील नगरसेवक गौरव चौधरी यांनी नगराध्यक्षा रत्नाबाई रघुवंशी व उपनगरध्यक्ष प्रथमेश चौधरी यांच्याकडे केली आहे.**

नंदुरबार शहरातील नगरपालिका हद्दीतील जागेत भव्य उद्यान, बगीच्याची निर्मिती करून त्या उद्यानाला समाजभूषण हिरालालकाका चौधरी स्मृती उद्यान, असे नामकरण करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. नंदुरबार शहरातील उत्तर भागातील रहिवाशींना अंत्यविधीसाठीदेखील मोठी अडचण होत आहे. त्या गोष्टीकडे देखील नगरसेवक गौरव चौधरी यांनी सर्वांचे लक्ष वेधून शहराच्या उत्तर भागात सुसज्ज विद्युत अमरधाम असावे, अशी मागणी करण्यात आली.

# एलईडी चित्ररथाच्या माध्यमातून समाज कल्याण विभागाच्या योजनांचा जागर

प्रतिनिधी । जळगाव

**समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी यासाठी एलईडी चित्ररथाच्या माध्यमातून प्रसिद्धी मोहिमेचा आज शुभारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय येथे अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांच्या हस्ते चित्ररथाला हिरवा झेंडा दाखविण्यात आला.**

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, उपजिल्हाधिकारी जितेंद्र कुवर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, समाज कल्याण अधिकारी अमोल कुलकर्णी, समाज कल्याण विभागाचे अधीक्षक राजेंद्र कांबळे उपस्थित होते. समाजकल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चित्ररथाद्वारे जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.जिल्ह्यातील विविध तालुक्यातील सुमारे ११० गावांमध्ये दोन एलईडी चित्ररथ फिरणार असून या द्वारे समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची प्रचार प्रसिद्धी करणार आहेत.

# कमर्शियल गॅस सिलिंडर तुटवड्याने व्यवसाय अडचणीत

प्रतिनिधी । धुळे

### मंगल कार्यालय, लॉन्स चालकांचे निदर्शने



**कमर्शियल एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे मंगल कार्यालय व लॉन्स व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त करत धुळे जिल्ह्यातील मंगल कार्यालय आणि लॉन्स चालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत गॅस पुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस, तेल, पेट्रोल व ऑईलच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून कमर्शियल गॅस सिलिंडरच्या वितरणावर निर्बंध आले आहेत. मंगल कार्यालय, लॉन्स तसेच केटरिंग व्यवसायासाठी कमर्शियल गॅस सिलिंडर अत्यावश्यक असल्याने त्याचा पुरवठा बंद झाल्यास संपूर्ण व्यवसाय ठप्प होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या लमसराईचा हंगाम सुरू झाला असून मार्च, एप्रिल व मे या महिन्यांत मोठ्या प्रमाणात विवाह समारंभ व सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. वर्षभरातील बहुतांश उत्पन्न या तीन महिन्यांतच मिळत असल्याने या काळात गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्यास व्यवसायावर गंभीर परिणाम होऊन अनेक कामगारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या काळातील विवाह सोहळ्यांची आगाऊ नोंदणी झालेली असल्याने गॅस उपलब्ध नसल्यास कार्यक्रमांचे नियोजन करणे कठीण होणार असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाने लग्नसराईचा हंगाम आणि संबंधित व्यावसायिकांची अडचण लक्षात घेऊन मंगल कार्यालय व लॉन्स व्यवसायासाठी कमर्शियल गॅस सिलिंडरचा नियमित पुरवठा सुरू ठेवावा व निर्बंधांमधून सूट द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर धुळे मंगलकार्यालय लॉन्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय बोरसे, सुरेंद्र कुलथे, गोविंद जोशी, किशोर संचेती, अर्जुन गिंदोडीया, अनुप बडगुजर, योगेश मोराणकर, बापू तिसे, प्रमोद सोनवणे, सुमित बडगुजर व हेरंब दाते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये आज राष्ट्रीय लोक अदालत

प्रतिनिधी । जळगाव

वर्षानुवर्षे विविध कारणांनी प्रलंबित राहणारे खटले, त्यातून होणारा आर्थिक खर्च व वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच आपसातील सामोपचाराने वाद मिटविण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार देशभर एकाच दिवशी दि. १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव यांनी दिली आहे. विधी सेवा प्राधिकरणव जिल्हा वकिल संघ, जळगाव यांचे संयुक्त विद्यमाने जळगाव येथे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या आवारात अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. क्यू. एस. एम. शेख यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोक अदालती होणार आहे. या उपक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी, जि.प.सीईओ, तसेच मनपा प्रशासन यांचे सहकार्य लाभणार आहे.

# ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी धरणे आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव



**ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, युजीसी कायदा तात्काळ लागू करण्यात यावा व २०११ पुर्वी जे शिक्षक नोकरीला लागलेले असतील त्यांना शिक्षक पात्रता परिक्षेतून वगळण्यात यावे, या मुद्यांवर शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी मोर्चा या सामाजिक संघटनांच्यावतीने एकदिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले.**

भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी या ३ मुद्यांवर ४ चरणबध्द आंदोलन घोषित केलेले आहेत. दुसऱ्या चरणात आज प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.भारत मुक्ती मोर्चा जळगाव जिल्हा अध्यक्ष देवानंद निकम, राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चा जिल्हा संयोजक प्रा.डॉ. सुभाष राणे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. केंद्र शासनाने ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला असतानाही जनगणनेच्या नोटिफिकेशनमध्ये ओबीसींच्या जातींचा स्वतंत्र कॉलमच न देणे हा ओबीसी समाजाशी केंद्र शासनाने धोखेबाजी केलेली आहे, अशा विविध मागण्यांसाठी दि. १३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव येथे सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले. राजकुमार गवळी, आबेदा तडवी, वसंत कोलते, डी.एन.पाटील, विजय निकम,गौतम सोनवणे, दिलीप सपकाळे, अरुण येवले, ॲड. समाधान सुरवाडे,ॲड. राजेश गवई, नितीन अहिरे, अक्षय तायडे, वसंत सपकाळे, मोहन गुमाने, सुमित्र अहिरे, कुंदन तायडे, गोपाळ पाटील, भगवान कांबळे, चंद्रशेखर अहिरराव, दिलीप तासखेडकर, प्रद्युम्न वारडे,मयुर तायडे, दिलीप जाधव, दिलीप इंगळे, मधुकर अहिरे, कैलास मसाने, अशोक बाविस्कर, रमेश थाटे, भीमराव नन्नवरे, देविदास पारधे, ईश्वर ढिवरे, रविंद्र मोरे आदी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला.

# विविध पदांसाठी १६ रोजी मुलाखती

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या वतीने १६ मार्च रोजी सकाळी १० वाजता शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राउंड जवळ, जळगाव येथे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये छबी इलेक्ट्रिकल्स तसेच सुप्रीम इंडस्ट्रीज, जळगाव यांसारख्या नामांकित उद्योगसंस्था सहभागी होणार असून विविध पदांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावर नोंदणी करून उपलब्ध रिक्त पदांसाठी सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीच्या दिवशी उपस्थित राहावे.

## पान १ वरुन

### ई-रिक्षा, ई-बाईकसाठी......

सुलभता आणण्यासाठी परिवहन विभागाकडून 'एक खिडकी योजना' सुरू करण्याची तयारी सुरू आहे. या योजनेंतर्गत अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी प्रक्रिया एकाच ठिकाणी सुलभ पद्धतीने पार पाडली जाणार आहे. तथापि, कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा अनियमितता टाळण्यासाठी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी परमिट घेणे अनिवार्य राहणार आहे. नवीन नियमानुसार इलेक्ट्रिक रिक्षा व ई-बाईकसाठीही परमिट घेणे आवश्यक राहील, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. या निर्णयामुळे प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत अधिक शिस्त येईल, नियमांचे पालन सुनिश्चित होईल आणि भविष्यात प्रवाशांना सुरक्षित व नियंत्रित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

### इराणच्या ड्रोन हल्ल्यात......

नंतर त्यांचा मृत्यू ओढवला. देवानंद यांच्यासह आणखी १५ भारतीय खलाशी याठिकाणी होते. त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. रात्रीच्या काळोखात दोन जहाजांवर इराणचे ड्रोन येऊन आदळले होते. यानंतर आगीचा मोठा गोळा जहाजावर दिसून आला. सफेसी विष्णू या तेलवाहू जहाजावरही हल्ला झाला. त्यात देवानंद सिंह यांचा मृत्यू झाला.

### होर्मुझच्या सामुद्रधुनीत......

ओलांडण्याची गरज नव्हती. हे जहाज भारतात येत नसून आफ्रिकेच्या दिशेने जात आहे, असे त्यांनी नमूद केले. सिन्हा पुढे म्हणाले की, प्रशासन या भागातील सर्व भारतीय जहाजांवर लक्ष ठेवून आहे आणि जहाज कंपन्यांशी जवळून समन्वय साधत आहे. त्यांनी खात्री दिली की, ङ्खप्रत्येक भारतीय जहाजाचे सरकारकडून निरीक्षण केले जात आहे. आखाती प्रदेशातील सागरी व्यापारांवर सिन्हा म्हणाले की, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीच्या आसपासच्या भागात अजूनही भारतीय ध्वज असलेली २७ जहाजे आणि ७०० हून अधिक खलाशी तैनात आहेत. हॉर्मुझ सामुद्रधुनीच्या पश्चिमेला, पर्शियन खाडीमध्ये भारतीय ध्वज असलेली २४ जहाजे आहेत, ज्यावर एकूण ६७७ भारतीय खलाशी आहेत; ही संख्या कालच्या इतकीच आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेला, ओमानच्या आखातात पूर्वी चार जहाजे होती. काल त्यांपैकी एक तेलवाहू जहाज, जग प्रकाश, त्या भागातून बाहेर पडले. परिणामी, आता त्या प्रदेशात भारतीय ध्वज असलेली तीन जहाजे शिल्लक असून त्यावर ७६ भारतीय खलाशी आहेत,फ्र असे त्यांनी नमूद केले.

सिन्हा यांनी संपूर्ण आखाती प्रदेशात काम करणाऱ्या भारतीय खलाशांच्या मोठ्या संख्येवरही प्रकाश टाकला. ते म्हणाले, ङ्कसंपूर्ण आखाती क्षेत्रात व्यापारी जहाजे आणि ऑफशोअर वेसल्ससह विविध जहाजांवर अंदाजे २३,००० भारतीय खलाशी कार्यरत आहेत. नौकानयन महासंचालनालय त्यांच्या संबंधित एजन्सींच्या माध्यमातून या सर्वांशी सतत संपर्कात आहे,फ्र असेही त्यांनी स्पष्ट केले. नौकानयन मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, जहाज कंपन्यांशी समन्वय राखण्यासाठी भारतातील सर्व बंदरांसाठी मानक कार्यप्रणाली जारी करण्यात आली आहे, तर एलपीजी वाहून नेणाऱ्या जहाजांना बंदरांवर प्राधान्य दिले जात आहे.

# प्रयोगशाळा सहाय्यकाची भूमिका अन् योगदान



**कपिल धनगर**
(प्रयोगशाळा सहाय्यक)
एच.आर. पटेल फार्मसी कॉलेज शिरपूर

**शै**क्षणिक संस्थांमध्ये प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची जागा आहे. प्रयोगशाळेतील सर्व कामे व्यवस्थित आणि सुरक्षित पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रयोगशाळा सहाय्यकाची भूमिका खूप महत्त्वाची असते. प्रयोगशाळा सहाय्यक हा शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील दुवा म्हणून काम करतो आणि प्रयोग यशस्वी होण्यासाठी आवश्यक सर्व तयारी करून ठेवतो.

प्रयोगशाळा सहाय्यक प्रयोग सुरू होण्यापूर्वी आवश्यक रसायने, काचसामुग्री आणि उपकरणे तयार ठेवतो. तसेच प्रयोगशाळेतील आधुनिक उपकरणे यांची योग्य देखभाल, तपासणी व कॅलिब्रेशन करण्याची जबाबदारी पार पाडतो. यामुळे उपकरणे अचूक आणि सुरक्षितपणे कार्य करतात.

विद्यार्थ्यांना प्रयोग करताना योग्य मार्गदर्शन करणे हीदेखील प्रयोगशाळा सहाय्यकाची महत्त्वाची जबाबदारी असते. अनेक वेळा शिक्षक अनुपस्थित असताना प्रयोगशाळा सहाय्यक विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके समजावून सांगतो व त्यांना प्रयोग व्यवस्थित पार पाडण्यासाठी मदत करतो. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचे व्यावहारिक ज्ञान अधिक दृढ होते.

प्रयोगशाळेतील सुरक्षा राखणे हेही अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. प्रयोगशाळेत फायर सेफ्टी उपकरणे, फर्स्ट एड बॉक्स आणि सुरक्षा नियमांची अंमलबजावणी याकडे विशेष लक्ष दिले जाते. यामुळे प्रयोगशाळेतील सर्व कामे सुरक्षित वातावरणात पार पडतात.

याशिवाय प्रयोगशाळेतील उपकरणे आणि प्रयोगांसाठी Standard Operating Procedure (SOP) तयार करणे, स्टॉक रजिस्टर व इन्स्ट्रुमेंट लॉग बुक ठेवणे, तसेच प्रयोगशाळेची स्वच्छता व शिस्त राखणे ही कामेही प्रयोगशाळा सहाय्यक प्रामाणिकपणे पार पाडतो.

अशा प्रकारे प्रयोगशाळा सहाय्यक हा शिक्षण संस्थेच्या वैज्ञानिक वातावरणाला बळकटी देणारा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांना प्रयोगांचे योग्य ज्ञान मिळते आणि प्रयोगशाळा अधिक प्रभावीपणे कार्य करते. म्हणूनच प्रयोगशाळेच्या प्रगतीसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयोगशाळा सहाय्यकाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# वरणगाव पालिकेची जुनी इमारत धूळखात

## ‘डिजिटल अभ्यासिके’साठी विद्यार्थ्यांचा एल्गार; १४ एप्रिलचा अल्टिमेटम

प्रतिनिधी । वरणगाव

**आम्ही कर भरतोय, मग सुविधा कोणासाठी? असा जळजळीत सवाल करत वरणगावच्या संतप्त विद्यार्थ्यांनी आणि सजग करदात्या नागरिकांनी आज नगरपरिषद प्रशासनाला धारेवर धरले. शहराच्या मध्यवर्ती भागात धूळ खात पडलेली नगरपरिषदेची जुनी इमारत ही केवळ वास्तू नसून ते वरणगावच्या विद्यार्थ्यांचे ‘उद्याचे भविष्य’ आहे. तिथे तातडीने ‘पंतप्रधान मोदीजींच्या व्हिजन’नुसार हाय-स्पीड व्हाय-फाय युक्त आधुनिक अभ्यासिका सुरू करावी, या मागणीसाठी आज नगराध्यक्ष सुनील काळे यांना निवेदन दिल्यानंतर अक्षरशः धारेवर धरण्यात आले.**



देशात डिजिटल इंडिया आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी-२०२०) गप्पा मारल्या जात असताना, वरणगाव नगरपरिषदेत अद्याप शिक्षण समिती गठीत का झाली नाही? शिक्षण सभापती पद रिक्त का आहे? असे बोचरे प्रश्न या निवेदनातून उपस्थित करण्यात आले आहेत. शहराच्या सुशोभीकरणावर लाखो रुपये खर्च करणाऱ्या प्रशासनाला गरीब विद्यार्थ्यांच्या पायपीटीची जाणीव का नाही, असा रोखठोक सवालही यावेळी करण्यात आला. विद्यार्थ्यांनी केवळ मागणीच केली नाही, तर प्रशासनाला ठोस मुदतही दिली आहे. नगरपरिषदेच्या आगामी बैठकीत विरोधी पक्षनेते, सभागृहनेते आणि सर्व नगरसेवकांनी गट-तट आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून या प्रस्तावाला एकमताने पाठिंबा द्यावा,अशी मागणी केली. ही आधुनिक अभ्यासिका येणाऱ्या ११ एप्रिल (महात्मा फुले जयंती) किंवा १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती) या क्रांतीदिनांचे औचित्य साधून कार्यान्वित व्हावी, अशी कळकळीची आणि तितकीच आक्रमक मागणी करण्यात आली आहे. मध्यवर्ती ठिकाणी ज्ञानमंदिर असलेल्या जुन्या इमारतीचे रूपांतर सुसज्ज अभ्यासिकेत करून रिकाम्या वास्तूचा सदुपयोग करावा. तसेच डिजिटल हाय-स्पीड मोफत व्हाय-फाय, सीसीटीव्ही कॅमेरे आणि स्पर्धा परीक्षांसंदर्भात ग्रंथांची सुविधा उपलब्धता अनिवार्य असावी, अशी मागणी करण्यात आली.

### गरीब विद्यार्थ्यांची पायपीट थांबवा

शहराबाहेरील अभ्यासिकेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांकडे स्वतःची वाहने नाहीत, त्यामुळे मध्यवर्ती ठिकाणीच जागा मिळावी. यासाठी प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी महेश सपकाळे, गौरव सोनार, तुषार भोई, सागर महाजन, शिवाजी धनगर, केदार माळी, शैलेंद्र माळी उपस्थित होते.

# जागतिक किडनी दिनानिमित्त रॅलीच्या माध्यमातून जनजागृती

प्रतिनिधी । जळगाव

**येथील आयएमए जळगाव शाखा, आरोग्यदीप किडनी फाउंडेशन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक किडनी दिनानिमित्त रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.**



जिल्हा सामान्य रुग्णालय येथून अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर यांनी हिरवा ध्वज दाखवून रॅलीला प्रारंभ झाला. यावेळी आयएमए व आरोग्यदीप किडनी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शशिकांत गाजरे, आयएमएचे मानद सचिव डॉ.भरत बोरोले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्नील सांगळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनल बोरोले, डॉ.नीता पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

किडनी आजाराविषयी लक्षणे, उपचार, घ्यावयाची काळजी याबद्दल विशेष चित्ररथाद्वारे आणि विविध संदेश फलक व घोषणा देत जनजागृती करण्यात आली.

रॅलीमध्ये आयोजक असलेल्या चारही संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, विविध कंपन्यांचे वैद्यकीय प्रतिनिधी, नर्सिंग कॉलेज व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, सिव्हिल हॉस्पिटलमधील अधिकारी, कर्मचारी, तंत्रज्ञ, रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## थोडक्यात

### महिला लोकशाही दिनाचे १६ मार्च रोजी आयोजन

**जळगाव ।** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन येत्या दि. १६ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रफिक तडवी यांनी दिली. समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी. यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिन जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी राबविण्यात येतो. त्यानुसार १६ मार्च रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे.

### पेट्रोल पंपावर चक्कर येऊन पडल्याने व्यावसायिकाचा मृत्यू

**जळगाव ।** मोहाडी रस्त्यावरील पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी गेलेल्या ६४ वर्षीय व्यावसायिकाला अचानक चक्कर येऊन पडल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याबाबत माहिती अशी की, रायसोनी नगरातील रहिवासी विरेंद्र रुढाभाई जैठवा (वय ६४) हे शहरातील परिचित किराणा व्यावसायिक होते. ते आपल्या वाहनात पेट्रोल भरण्यासाठी मोहाडी रस्त्यावरील पेट्रोल पंपावर गेले होते. पेट्रोल भरत असतानाच त्यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली कोसळले. ही घटना पाहताच तेथील नागरिकांनी तातडीने धाव घेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

# पाचोरा नगरपरिषदतर्फे स्वच्छता सखी सन्मान सोहळा



प्रतिनिधी । पाचोरा

**शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी पाचोरा नगरपरिषद आणि कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता सखी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. १२ मार्च रोजी व्यापारी भवन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.**

कार्यक्रमाचे अध्यक्षपद नगराध्यक्षा सुनीता किशोर पाटील यांनी भूषवले. याप्रसंगी पाचोरा नगरपरिषदेतील महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशनचे कार्यक्रम अधिकारी मुकेश चव्हाण, नाशिक विभागाचे कार्यकारी अधिकारी देवेंद्र केळोदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांचे सक्षमीकरण आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य या विषयांवर सखोल माहिती देऊन महिलांना आरोग्याप्रति जागरूक राहण्याचे आवाहन केले.

शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात महिला स्वच्छता दूतांचा मोठा वाटा आहे, असे प्रतिपादन करत नगराध्यक्षा सुनीता पाटील यांनी केले. त्यांच्या हस्ते सर्व महिला कर्मचाऱ्यांना भेटवस्तू म्हणून साड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास व्यासपीठावर उपनगराध्यक्ष किशोर बारावकर, आरोग्य सभापती सतीश चेडे, आरोग्य निरीक्षक तुषार नकवाल, विरेंद्र घारू, शहर समन्वयक निखिल पाटील आणि लिपिक आकाश खैरनार, महिला व बालकल्याण सभापती मिनाक्षी एरंडे, नगरसेविका सुरेखा पाटील, जयश्री पाटील, वर्षा ब्राम्हणे, मनिषा बाविस्कर, प्रांजल सावंत, खनसा बागवान, कविता हटकर आणि नगरसेवक संजय चौधरी, संदीपराजे पाटील, योगेश पाटील, गोपालदास वासवाणी, राहुल गायकवाड यांच्यासह नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पाचोरा नगरपरिषद आणि कुशाग्र फाउंडेशनच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी समता सैनिक दलात सहभागी व्हा : विजय निकम

प्रतिनिधी । जळगाव

**देशांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय ही महान तत्वे रुजवली गेली पाहिजे. या देशात समता प्रस्थापित झाली पाहिजे, असे महान ध्येय समता सैनिक दलाचे आहे. हे ध्येय आपल्याला यशस्वी करण्यासाठी समता सैनिक दल मजबूत करणे ही काळाची गरज आहे. समता सैनिक दलात सर्वांनी सहभागी व्हा, असे आवाहन राज्य संघटक विजय निकम यांनी रॅलीच्या समारोपप्रसंगी केले.**




महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ मार्च १९२७ रोजी समता सैनिक दलाची स्थापना केली आहे. आज या संघटनेला १०० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त दि. १३ मार्च रोजी जळगाव शहर व ग्रामीण शाखेच्यावतीने समता सैनिक दलाचे राज्य संघटक विजय निकम यांच्या नेतृत्वाखाली शहरात मोटारसायकल रॅली काढण्यात आली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विजय निकम यांच्या हस्ते माल्यार्पण करून रॅलीची सुरुवात रेल्वे स्टेशन येथून करण्यात आली.

नेहरू चौक, टॉवर चौक, चित्रा चौकमार्गे गोलानी मार्केट तेथून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोरून नवीन बस स्टॅन्ड अशा विविध भागातून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत जिल्हा मुख्य संघटक चैतन नन्नवरे, जिल्हा संघटक राजेश गवई, महानगराध्यक्ष मुकुंदराव भालेराव, सुपडू संतांशी, संजय सपकाळे, अनिता कापुरे, प्रतिभा घोडेस्वार, निलेश बाविस्कर, विनोद निकम, एकनाथ सोनवणे, वसंत सपकाळे, गौतम सोनवणे, रमेश उमाळे, भैय्यासाहेब निकम, सुधीर शेंगदाणे, श्रीकांत शिरसाट, संतोष बागुल, सोमा अहिरे आदी या रॅलीत सहभागी झाले होते.

# गुणवत्तेच्या आधारे ऑन-जॉब ट्रेनिंग निवड प्रक्रिया

प्रतिनिधी । जळगाव

**मू.जे. महाविद्यालय, जळगाव येथील संगणकशास्त्र विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी ऑन-जॉब ट्रेनिंग निवड प्रक्रिया गुणवत्तेच्या आधारे आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला.**



सुरुवातीला विद्यार्थ्यांना एलएमएस पोर्टलवर मूलभूत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिक उपक्रम व असाइनमेंट्स देण्यात आले. ज्याद्वारे त्यांच्या कौशल्यांचे मूल्यमापन करण्यात आले. निवड प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मुलाखती घेवून उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची पुढील टप्प्यासाठी निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्स एआय या संस्थेमार्फत ऑन जॉब ट्रेनिंगची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळून त्यांच्या कौशल्यविकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे विभागप्रमुखांनी सांगितले. मु. जे. महाविद्यालायासोबत करार झालेले विविध सॉफ्ट वेअर जसे अप थिंक सोल., मुद्रा सोल. व इतर सॉफ्टवेअर कंपनीसोबत हा उपक्रम राबविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# कर्जमाफी पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध करा; प्रांतांना साकडे

प्रतिनिधी । पाचोरा

**महाराष्ट्र राज्य सरकारने जाहीर केलेल्या महाराणी अहिल्याबाई होळकर २०२६ ची कर्जमाफी योजनामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या योजनांतर्गत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत थकित असलेल्या पीक कर्जावर मुद्दल व्याजसह दोन लाख रुपयांची कर्जमाफी करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सोबतच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येणार आहे.**



यासाठी आधार लिंकिंग अनिवार्य करण्यात आली आहे. शेतकऱ्यांमध्ये कर्जमाफीबाबत कोणताही संभ्रम होणार नाही. तसेच पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचा यात त्यांच्या नावाचा समावेश झालेला आहे की नाही ही माहिती मिळावी, यासाठी शासनाने कर्ज माफ शेतकऱ्यांच्या गाव निहाय याद्या प्रसिद्ध कराव्या. संबंधित याद्या ग्रामपंचायत, चावडी, सोसायटी कार्यालयात उपलब्ध करून द्याव्या. शेतकऱ्यांना सोयीस्कर व्हाव्या म्हणून कर्जमाफीच्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकेत उपलब्ध करून देण्यात याव्या. पारदर्शकता राखण्यासाठी अधिकृत शासकीय वेब साईटवर याद्या प्रसिद्ध करण्यात याव्या, अशा मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे आणि पाचोरा तालुका सहाय्यक निबंधक कार्यालय येथे देण्यात आले. यावेळी बांबरूड-कुरंगी गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य पदमसिंग पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख विनोद तावडे, शेतकरी विजय पोपट पाटील, विकासो चेअरमन वेरूळी, हेमराज पाटील माजी सरपंच मोहाडी, संतोष पाटील, राजू चौधरी, रोहित पाटील आसनखेडा आदींची उपस्थिती लाभली होती.

# गारखेडा प्रसूतीप्रकरणी कंत्राटी आरोग्यसेविकेवर कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**रावेर तालुक्यातील गारखेडा उपकेंद्र परिसरात १० मार्च रोजी घडलेल्या प्रसूती प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी गारखेडा आरोग्य उपकेंद्रातील कंत्राटी आरोग्यसेविका नंदा कडू पाटील यांना सेवेतून कमी करण्याची कारवाई केली आहे.**

गारखेडा आरोग्य उपकेंद्रात १० मार्च रोजी मध्यरात्री सुमारे १ वाजेच्या सुमारास एका महिलेची प्रसूतीची घटना घडली. रुकसान अजित तडवी या तिसऱ्या खेपाच्या गरोदर महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर संबंधित आशा सेविकेने तत्काळ गारखेडा येथील उपकेंद्रात दाखल केले. उपकेंद्रात कार्यरत असलेल्या कंत्राटी आरोग्य सेविकेला (एएनएम) याबाबत दूरध्वनीद्वारे तात्काळ कळविण्यात आले होते. मात्र, नंदा कडू पाटील या मुख्यालयी राहत नसल्याने त्या वेळेत उपकेंद्रात उपस्थित राहू शकल्या नाहीत. दरम्यान, गरोदर महिलेच्या प्रसूती वेदना वाढत असल्याने आणि आरोग्यसेविका उपकेंद्रात पोहोचण्याआधीच प्रसूतीची वेळ आल्याने तेथे उपस्थित असलेल्या आशासेविकेने आपल्या प्रशिक्षणाचा उपयोग करून उपकेंद्रात उपलब्ध असलेल्या आवश्यक वैद्यकीय साधनसामग्रीच्या सहाय्याने अत्यंत दक्षतेने मध्यरात्री सुमारे १ वाजता प्रसूती प्रक्रिया पार पाडली. सदर आशासेविकेने प्रशिक्षण घेतलेले असल्याने प्रसूती सुरक्षितरित्या पार पडली. प्रसूतीनंतर नवजात बाळ रडत नसल्याचे लक्षात येताच आई व बाळाला तात्काळ पुढील उपचारासाठी पाल ग्रामीण रुग्णालयात रेफर करण्यात आले. पाल ग्रामीण रुग्णालयात बाळावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी सावदा येथे हलविण्यात येत असताना दुर्दैवाने सावदा येथे पोहोचण्यापूर्वीच रस्त्यात नवजात बाळाचा मृत्यू झाला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याने चौकशी करुन सीईओंनी आरोग्यसेविकेवर कारवाई केली.

**प्रथमदर्शनी चौकशीत कंत्राटी आरोग्यसेविका नंदा कडू पाटील या मुख्यालयी राहत नसल्याने आरोग्य सेवेवर प्रश्न निर्माण झाल्याची बाब समोर आल्याने त्यांच्यावर सेवेतून कमी करण्याची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाकडून ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व तत्पर राहण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

# यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय, नटवर्य लोटू पाटील नाट्य पुरस्कार सोहळा उत्साहात

## नाटककार अतुल पेठे, दत्ता देसाई यांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी । जळगाव

**मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर आयोजित जैन इरिगेशन सिस्टिम्स जळगाव यांच्या प्रायोजकत्वाखाली यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय पुरस्कार आणि नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्य पुरस्कार २०२६ प्रदान सोहळा दि. १२ मार्च रोजी उत्साहात पार पडला.**



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कोतिकराव ठाले पाटील होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून साहित्य व नाट्य क्षेत्रातील समृद्ध परंपरेचा गौरव केला. प्रारंभी यशवंतराव चव्हाण आणि नटवर्य लोटू पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. प्रास्ताविकात डॉ.दादा गोरे यांनी पुरस्कार परंपरा आणि त्यामागील उद्देश याचा आढावा घेतला.

यावर्षीचा यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय पुरस्कार पुणे येथील ज्येष्ठ लेखक दत्ता देसाई यांना सनातन : राष्ट्रीय चक्रव्यूहाचा भेद या ग्रंथासाठी प्रदान करण्यात आला. तर नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्य पुरस्कार पुणे येथील नाटककार अतुल पेठे यांना नाट्यलेखन व मराठी रंगभूमीवरील उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात आला. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व धनादेश देऊन पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे यांनी समितीचा अहवाल सादर केला. यावेळी डॉ. हंसराज जाधव व डॉ. गणेश शिंदे यांनी पुरस्कार विजेत्यांच्या साहित्य व नाट्य कार्याचा परिचय करून दिला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर दत्ता देसाई व अतुल पेठे यांनी मनोगत व्यक्त केले. व्यवहारवाद वाढला आहे. त्या पलीकडे जाऊन त्याचे पुन्हा एकदा बघण्याची तसेच संविधान बचाव करण्याची आज आवश्यकता असल्याचे देसाई यांनी यावेळी सांगितले.

### ➤ नटवर्य लोटू पाटील यांचे नातू मंगेश काळे यांचा गौरव

जिथे सोयगाव येथे नाटकाच्या तालमी व्हायच्या. तिथे त्यांचे नातू मंगेश नारायणराव काळे यांनी नटवर्य लोटू पाटील कलादालन उभारले आहे. त्याचे लवकरच उद्घाटन होणार आहे. त्यांच्या या कार्याबद्दल मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगरतर्फे विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी कोरडे यांनी तर डॉ. जयप्रकाश चांदखेडे यांनी आभार प्रदर्शन केले. साहित्यप्रेमींच्या उत्स्फूर्त उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# पारोळा कुटीर रुग्णालयातील एसी बंद करण्याची मागणी; वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन

प्रतिनिधी । पारोळा

**येथील कुटीर रुग्णालयातील प्रशासकीय दालनात सुरू असलेली एअर कंडिशनिंग (एसी) यंत्रणा तातडीने बंद करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी वैद्यकीय अधीक्षकांना दिलेल्या लेखी निवेदनातून केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना अनेकदा मूलभूत सुविधांसाठी अडचणींचा सामना करावा लागत असताना प्रशासकीय कक्षात एसीचा वापर होणे योग्य नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, कुटीर रुग्णालयातील काही प्रशासकीय दालनांमध्ये एसी यंत्रणा सुरू आहे. रुग्णालय हे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी असताना प्राथमिक सुविधा, स्वच्छता, औषधोपचार आणि रुग्णांच्या सोयींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मात्र अशा परिस्थितीत प्रशासकीय दालनात एसीचा वापर होऊन मोठ्याप्रमाणात विजेचा खर्च होत असल्याची नाराजी निवेदकांनी व्यक्त केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, रुग्णालयातील खर्च हा जनतेच्या करातून होत असल्यामुळे विजेचा अनावश्यक वापर टाळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रशासकीय दालनातील एसी यंत्रणा तातडीने बंद करून विजेची बचत करावी, तसेच रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीचा वापर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते जाकीर पिंजारी व सामाजिक कार्यकर्ते शाकीर जाकीर पिंजारी यांनी वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन सादर करत लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्याची मागणी केली आहे.. तसेच रुग्णहिताला प्राधान्य देत प्रशासनाने याबाबत सकारात्मक पावले उचलावीत, अशी अपेक्षाही नागरिकांतर्फे व्यक्त करण्यात आली आहे..

# डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात चार दिवसीय 'संस्मित महोत्सव २०२६' उत्साहात



प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयाच्या व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित चार दिवसीय 'संस्मित महोत्सव२०२६' या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**

'संस्मित महोत्सव२०२६' अंतर्गत पुढील चार दिवस विविध सांस्कृतिक, बौद्धिक आणि समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास व सामाजिक जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा गांधी शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. स्मिता पाटील यांच्या हस्ते 'संस्मित महोत्सव२०२६' या फलकाचे अनावरण करून करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा व्यवस्थापन विभागाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

उद्घाटन सोहळयास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे, उपप्राचार्य प्रा. डॉ.आर.एम. बागुल, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ, प्रबंधक डी. एम.पाटील तसेच व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ.अभिजीत साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# वेळोदे येथे गायींच्या कुरणाला आग केळी, मका, पाईप ठिबक जळून खाक

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गलंगी येथून जवळच असलेल्या वेळोदे येथे दुपारच्या सुमारास रमाई नगरच्या बाजूस असलेले गायींच्या चराईसाठीच्या कुरणाला अचानक आग लागल्याने शेतातील केळी पीक व शेती साहित्य जळून खाक झाल्याने प्रचंड नुकसान झाल्याची घटना घडली.**



शेतकरी अशोक देवलाल जयस्वाल यांचे वेळोदे गट नंबर ३४२ मधील शेतात केळी लागवड केलेली आहे. अचानक लागलेल्या अग्नीच्या तांडवाने शेतातील १२ पाईप, ५ बंडल ठिबक नळी व केळी पीक जळाल्याने नुकसान झाले आहे. यापूर्वी या शेतकऱ्यांचे मागच्या वर्षी अवकाळी पावसाने केळीचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते. आता पुन्हा आगीच्या तांडवांमध्ये नुकसान झाल्याने शेतकरी पार खचून गेला आहे. प्रेमलता पाटील यांच्या हाता-तोंडाशी आलेला मका पिकाला चांगलाच फटका बसला आहे. पोलीस पाटील मिलिंद करंकाळ व कोतवाल सीमा सतीश करंकाळ यांनी अग्निशामक दल, ग्रामीण पोलीस स्टेशन व महसूल विभागास भ्रमणध्वनीद्वारे माहिती दिली असता संबंधितांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.



**अग्निशमन दल व ग्रामस्थांच्या प्रयत्नाने आग आटोक्यात आणली. यावेळी मंडळ अधिकारी हर्पे, कृषी अधिकारी राहुल साळुंखे, वेळोदे ग्रामसेवक राकेश देवरे, तलाठी दिनेश बारेला व घोडगाव बीट अमलदार हेमंत कोळी व गावातील शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची मागणी केली आहे.**

## विद्यापीठ नेटबॉल संघात दोघांची निवड

प्रतिनिधी । पारोळा

किसान महाविद्यालय पारोळा येथील खेळाडू तुषार भानुदास पाटील आणि तुषार नाटू पाटील या दोघांची विद्यापीठाच्या नेटबॉल संघात निवड झाली आहे. या स्पर्धा सेज विद्यापीठ, भोपाल येथे ९ मार्च २०२६ पासून सुरू आहेत. या जोडीचे माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, जि.प. सदस्य रोहन पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# मोफत मोतीबिंदू शिबिरातून रुग्णांना दिलासा

प्रतिनिधी । धरणगाव

**जळगाव ग्रामीण मतदारसंघातील शामखेडा(ता.धरणगाव) येथे शिवसेना शाखेच्या माध्यमातून जीपीएस परिवार व मुक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



युवा नेतृत्व व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा समाजोपयोगी उपक्रम पार पडला. या शिबिरात नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. हृदयरोग तपासणी, रक्तदाब मोजणी, मधुमेह तपासणी, ऑक्सिजन पातळी तपासणी, सामान्य आरोग्य तपासणी तसेच मोतीबिंदू तपासणी अशा सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. गावातील तसेच परिसरातील अनेक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घेतली व तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन घेतले. शिबिरादरम्यान मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांची पुढील शस्त्रक्रिया नुकतीच जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव येथील नेत्र विभागात पार पडली. नेत्रतज्ञ डॉ. प्रवीण पाटील यांनी या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या. शस्त्रक्रियेनंतर संबंधित रुग्णांना आज चष्मे व औषधांचे वाटप करून त्यांना घरी सुटी देण्यात आली. शस्त्रक्रिया झालेल्या ज्येष्ठ नागरिकांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि युवा नेतृत्व प्रतापराव पाटील यांच्या समाजाभिमुख उपक्रमांचे कौतुक केले. अशा प्रकारच्या आरोग्य शिबिरांमुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मुक्ती फाउंडेशनचे मुकुंद गोसावी, शामखेडा शिवसेना शाखा प्रमुख गणेश भिगाने, पदाधिकारी, शिवसैनिक व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच नेत्रचिकित्सा अधिकारी तुषार जोशी, दिलीप कुमावत व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## चौगाव येथे उद्या हभप इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन

प्रतिनिधी । चोपडा



**तालुक्यातील चौगाव येथे कै. गुमानबाई पिरसिंग राजपूत यांच्या पुण्यस्मरणार्थ सुप्रसिध्द कीर्तनकार हभप इंदुरीकर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन दि.१५ मार्च रविवारी संध्याकाळी ठिक ६ वाजता चौगाव येथे लासुर रस्त्यालगत करण्यात आले आहे.**

चौगाव पंचक्रोशीतील भजनी मंडळ व ग्रामस्थांचेही या कीर्तनास सहकार्य लाभणार आहे. कीर्तनाचे आयोजन प्रा.विनोद राजपूत ,सुलभा राजपूत (माजी सरपंच चौगाव) शहादा येथील तहसीलदार संभाजी शिवाजी राजपूत, महेंद्र पिरसिंग राजपूत,विजय शिवाजी राजपूत यांनी केले आहे.

तरी चौगाव पंचक्रोशीतील भाविकांनी आवर्जून उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा ,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पारोळा नगरपरिषदेत जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य सेविका, आशा वर्कर्सचा सन्मान

प्रतिनिधी । पारोळा

**जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालकल्याण विभाग, पारोळा नगरपरिषद आणि बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना क्रमांक १ यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य सेविका, आशा वर्कर व महिला कर्मचाऱ्यांच्या सन्मानासाठी तसेच सर्व वयोगटातील महिलांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन दि. ९ मार्च २०२६ रोजी पारोळा नगरपरिषद कार्यालयात करण्यात आले होते.**



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मृणाल पाटील होत्या. कार्यक्रमास नगरसेविका किरण पाटील, निर्मला वाणी, अलका महाजन, सोनाली चौधरी, रोहिणी मोरे, सुवर्णा पाटील, पल्लवी जगदाळे, वंदना शिरोळे, कविता मिस्त्री, माधुरी पवार, स्मिता पाटील, मीनाबाई कासार, सुनीता कासार, मानसी तांबे, सुनीता शिरोळे, स्मिता सोनार, भाग्यश्री अनुष्ठान, मंगलाबाई चौधरी, शीतल मराठे, कविता दाणेज यांसह डॉ. वैशाली नेरकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी नगरपरिषदेतील आरोग्य सेविका व महिला कर्मचाऱ्यांचा साडी व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आशा वर्कर महिलांचा गुढी वस्त्र व गुलाब पुष्प देऊन विशेष सन्मान डॉ. वैशाली नेरकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष मृणाल पाटील यांनी आपल्या मनोगतात महिला व बालकल्याण विभागाच्या उपक्रमांचे कौतुक करत नगरपरिषदेच्या माध्यमातून महिलांसाठी असेच नाविन्यपूर्ण कार्यक्रम पुढेही राबवावेत, असे मत व्यक्त केले. तसेच नगरसेविका अलका महाजन, निर्मला वाणी आणि किरण पाटील यांनीही आपल्या मनोगतातून महिलांच्या आरोग्य व सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. यानंतर महाआरोग्य शिबिराच्या वैद्यकीय तपासणीचा शुभारंभ मृणाल पाटील, किरण पाटील व महिला व बालकल्याण सभापती निर्मला अशोक वाणी यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक कार्यालय अधीक्षक श्रीमती यामिनी जटे यांनी केले तर आभार प्रदर्शन साक्षी मराठे (नगररचना सहाय्यक) यांनी मानले. या उपक्रमामुळे शहरातील महिलांना आरोग्य तपासणी व सन्मानाचा लाभ मिळाला.

# ग्रामीण महिलांनी गिरवले कॉम्प्युटर चालविण्याचे धडे

## आधार संस्थेचा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी । चोपडा

**ग्रामीण भागातील महिलांना डिजिटल साक्षरतेकडे वाटचाल करण्यासाठी अमळनेर येथील आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे स्वामिनी प्रकल्पांतर्गत 'उमेद' अभियानात कार्यरत समुदाय साधन व्यक्ती महिलांसाठी मोफत बेसिक कॉम्प्युटर प्रशिक्षण कोर्सचे आयोजन करण्यात आले होते.**





या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध प्रकारची माहिती पाठवणे, अहवाल तयार करणे तसेच कार्यालयीन कामकाजासाठी मायक्रोसॉफ्ट वर्ड व एक्सेलचा वापर करावा लागतो.

या कामांमध्ये त्यांना मदत व्हावी आणि त्या अधिकाधिक डिजिटल साक्षर बनाव्यात, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत १२ दिवसांचे बेसिक कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात एकूण ३५ महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान सहभागी महिलांना एम.एस. ऑफिस, एम.एस. वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन यांसह विविध आधुनिक एआय टूल्सबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रत्यक्ष कॉम्प्युटरवर सराव करण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली. या प्रशिक्षणाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महिलांना पूर्णपणे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व सहभागी महिलांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यासोबतच त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत पुढील मार्गदर्शनही देण्यात येणार असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले. प्रशिक्षणाच्या सांगता समारंभास आधार संस्थेच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील व कार्यकारी संचालक श्रीमती रेणू प्रसाद उपस्थित होत्या. उमेद अभियानाच्या तालुका अभियान व्यवस्थापक सीमा रगडे तसेच तालुका व्यवस्थापक ज्योती भावसार यांनीही उपस्थित राहून महिलांना प्रोत्साहन दिले. यावेळी डॉ.भारती पाटील यांनी महिलांना आर्थिक स्वावलंबन व उद्योजकतेविषयी मार्गदर्शन केले. तर सीमा रगडे यांनी उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांना या प्रशिक्षणाचा मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक तुषार चौधरी व सुमित पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## संजय गांधी दिव्यांग विशेष सहाय्य योजनेसाठी - युडीआय प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । चोपडा

संजय गांधी दिव्यांग विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थींनी आपले युडीआय कार्ड व प्रमाणपत्र (Unique Disability ID Certificate)व आधारकार्ड झेरॉक्स प्रत संजय गांधी शाखा, तहसील कार्यालय चोपडा येथे मुदतीत सादर करावी, अन्यथा सेवा न मिळाल्यास स्वतः जबाबदार राहाल. तरी दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले कागदपत्रे त्वरित जमा करावीत, असे आवाहन तहसीलदार कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

योजनेचा लाभ नियमितपणे सुरू ठेवण्यासाठी शासनाच्या शासन निर्णयानुसार पात्रतेची पडताळणी करणे आवश्यक असल्यामुळे सर्व दिव्यांग लाभार्थींनी आपले वैध व अद्ययावत UDI प्रमाणपत्र लवकरात लवकर २५ मार्च २०२६ पर्यंत आपल्या गावाचे संबंधित महसूल सेवक (कोतवाल )यांच्यामार्फत तहसील कार्यालयात जमा करावे.असे न केल्यास माहे एप्रिल २०२६ मध्ये मिळणारे माहे मार्च २०२६चे अनुदान वितरीत न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही लाभार्थींची जबाबदारी असुन शासनास सहकार्य करावे असे त्यांनी म्हटले आहे.